वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/50939-L/230/RNP/Beed/2025-27 संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार-रविवार दि. २२ जून २०२५ पाने ४ किंमत ३

# शिक्षकांच्या पगाराचा 'शालार्थ' घोटाळा

## शालार्थ आयडी तयार करताना काही बनावट कागदपत्र जोडण्यात आले

## अस्तित्वात नसलेल्या शिक्षकांचेही शालार्थ आयडी तयार करण्यात आली

Email:- dailydivyawarta@Gmail.com
Email:-editordivyawarta@gmail.com

दिव्य वार्ता




### मोठे अधिकारी अटकेत, चौकशीसाठी विशेष पथकाची स्थापना

**बीड, (दिव्य न्युज):- शासनाला कोट्यवधी रुपयांचा चुना लावणारा नागपुरातील शालार्थ आयडी घोटाळा गेल्या दोन महिन्यांपासून गाजत आहे. या घोटाळ्यात शिक्षण विभागातील चार बड्या अधिकाऱ्यांना अटक झालेली आहे. तसंच नागपूर सायबर पोलिसांनी या प्रकरणाच्या तपासासाठी विशेष तपास पथकाची स्थापनाही केली आहे.या एसआयटीच्या तपासात आतापर्यंत काय काय समोर आलं? किती शिक्षकांचे बोगस शालार्थ आयडी बनवण्यात आले? यात कोणाकोणाला अटक करण्यात आली? याबाबत आपण जाणून घेणार आहोत. सर्वात आधी चर्चा होत असलेलं हे बोगस शालार्थ आयडी प्रकरण नेमकं काय आहे? हे समजून घेवूयात. बोगस शालार्थ आयडी घोटाळा काय आहे? एखादा शिक्षक शाळेत शिक्षण सेवक म्हणून काम करत असेल तर त्याला सुरुवातीला काही वर्ष मानधन दिलं जातं.**

त्यानंतर त्या शिक्षकाला नियमित केलं जातं. नियमित झाल्यानंतर त्या शिक्षकाचा शालार्थ आयडी काढला जातो, त्याद्वारे शासनाकडून त्याला पगार सुरू होतो. हे आयडी तयार करण्याचे अधिकार शिक्षण उपसंचालकांना असतात. पण, हेच शालार्थ आयडी तयार करताना काही बनावट कागदपत्र जोडण्यात आल्याचं समोर आलं. तसंच काही अस्तित्वात नसलेल्या शिक्षकांचेही शालार्थ आयडी तयार करून शासनाच्या तिजोरीतून पगार काढण्यात आले. उदाहरण द्यायचं झाल्यास, एखादा शिक्षक २०१५ मध्ये शिक्षण सेवक म्हणून नियुक्त झाला असेल आणि २०२२ मध्ये तो नियमित झाला असेल तर त्याची शालार्थ आयडी तयार करून त्याला २०२२ पासूनचा पगार मिळायला पाहिजे. पण, गैरव्यवहार करत अधिकचे पैसे मिळवण्यासाठी या शिक्षकांची नियुक्ती मागील तारखेत दाखवून अनेक वर्षांचं थकीत वेतन उचलण्यात आलं.

हा सगळा घोटाळा संस्थाचालक आणि शिक्षण विभागातल्या बड्या अधिकाऱ्यांच्या संगनमताने चालत होता, अशी माहिती एसआयटीच्या प्रमुख आणि सहाय्यक पोलिस आयुक्त सुनिता मेश्राम यांनी दिली. शिक्षण विभागाला याबाबत संशय आल्यानंतर पुण्यातील प्राथमिक शिक्षण संचालकांनी नागपूर विभागीय अध्यक्ष चिंतामण वंजारी यांच्या नेतृत्वाखाली एक चौकशी समिती नेमली. त्यांना नागपूर जिल्ह्यातील ५८० शिक्षकांचे बोगस शालार्थ आयडी तयार केल्याचं आढळलं. ती यादी शिक्षण विभागाकडे पाठवण्यात आली.यादीची प्राथमिक तपासणी केली असता शालार्थ आयडी प्रणालीचा पासवर्ड हॅक करून किंवा त्याचा गैरवापर करून ड्राफ्ट जनरेट केल्याचं सुरुवातीला समोर आलं होतं. तसंच जिल्हा परिषद नागपूरमधील प्राथमिकचे वेतन व भविष्य निर्वाहचे अधीक्षक नीलेश वाघमारे यांनी वेतन देयक आणि थकीत देयक काढण्याचं प्राथमिक चौकशीत समोर आलं होतं.

या प्रकरणात शासकीय निधीचा अपहार केल्याप्रकरणी नीलेश वाघमारे यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली होती. त्यांच्या निलंबनाच्या आदेशातच बोगस शालार्थ आयडी तयार केल्याचा उल्लेख होता. या प्राथमिक चौकशीनंतर नागपूरच्या सायबर पोलीस ठाण्यात, आयडी-पासवर्ड हॅक करून बनावट शालार्थ आयडी तयार केल्याची तक्रार शिक्षण उपसंचालक कार्यालयातील कर्मचारी रवींद्र पाटील यांनी दिली होती. त्यानुसार सायबर पोलिसांनी तपास सुरू केला. सायबर पोलिसांनी सुरुवातीला शिक्षण उपसंचालक उल्हास नरड यांच्यासह त्यांच्या कार्यालयातील लिपिक सुरज नाईकला अटक केली. या घोटाळ्याची व्याप्ती मोठी असल्याचे

▶▶ पान २ वर

# मुस्लिम समाजाला अपमानास्पदशब्द म्हणणारा संग्राम जगताप अजूनही पक्षात का आहे?-अन्वर हाशमी



बीड, (दिव्य न्युज):- राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (अजित पवार गट) चा आमदार संग्राम जगताप यांनी मुस्लिम समाजाविषयी सार्वजनिकरित्या लाड्या हा अत्यंत अपमानास्पद, घृणास्पद व जातीय तेढ निर्माण करणारा शब्द वापरला. हा शब्द केवळ एका समाजाचा अपमान करणारा नाही, तर राज्यातील सामाजिक सौहार्द आणि संविधानाच्या मूल्यांवर थेट आघात करणारा आहे.एका पक्षाचे आमदार जर संविधानाचा अवमान करत असतील, तर पक्ष गप्प का आहे? भाजपशी युती झाल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसही मुस्लिमविरोधी वाटचाल करत आहे का? माफी मागण्याऐवजी संग्राम जगताप यांना संरक्षण दिलं जातंय का? राष्ट्रवादी काँग्रेससाठी मुस्लिम समाज फक्त मतांचे साधन आहे का?आमच्या ठाम मागण्या पुढील आहेत. ज्यामध्ये संग्राम जगताप यांनी तात्काळ जाहीर माफी मागावी. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने त्यांना पक्षातून तात्काळ निलंबित करावे. पक्षाने मुस्लिम समाजाची माफी मागत स्पष्ट भूमिका घ्यावी. जर या मागण्यांकडे दुर्लक्ष झाले, तर शेरे हिंद शहीद टिपू सुलतान संघटना संपूर्ण राज्यभर संविधानिक मार्गाने आंदोलन उभारेल. हे केवळ मुस्लिम समाजाचे नव्हे, तर महाराष्ट्रातील समतेवर, बंधुतेवर आणि शांततेवर झालेला हल्ला आहे.

जर संग्राम जगताप याची पक्षातून हकालपट्टी झाली नाही, तर महाराष्ट्रात राष्ट्रवादी काँग्रेसला मुस्लिम समाजातून स्थानिक स्वराज्य संस्थांपासून ते विधानसभा निवडणुकांपर्यंत एकही मते मिळणार नाहीत.

# बांधावरील झाडं तोडण्यास विरोध केला म्हणून महिलेसह कुटुंबीयांना बेदम मारहाण

## बीडमध्ये पुन्हा धक्कादायक प्रकार,आरोपी फरार

वडवणी, (दिव्य न्युज):- केज तालुक्यातील मस्साजोग गावाचे सरपंच संतोष देशमुख यांची निर्घृण हत्या करण्यात आल्याची घटना समोर आल्यानंतर बीड जिल्हा राज्यभरात चर्चेत आला आहे. या घटनेनंतर बीड जिल्ह्यात गुन्हेगारीच्या घटनांना आळा बसताना दिसत नाही. चोरी, घरफोडी, मारामारी, बलात्कार, छेडछाड आणि लुटमारी यांसारख्या घटनांमुळे सामान्य नागरिकांमध्ये भीतीचं वातावरण निर्माण झालं आहे. गेल्या काही महिन्यात बीडमध्ये गुन्हेगारीच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याचे चित्र आहे. आता पुन्हा एकदा बीडमधून एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. शेताच्या



बांधावरील झाडं तोडण्यास विरोध केल्याने एका महिलेवर आणि तिच्या कुटुंबीयांवर जीवघेणा हल्ला करण्यात आल्याचा प्रकार वडवणी तालुक्यात घडला आहे.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, देवळा ते कोरडे वस्ती दरम्यान पायवाटेवर असलेल्या शेताच्या बांधावरील तब्बल ८०-९० वर्षे जुनी लिंबाची झाडं तोडली जात होती. महिलेनं हे झाड तोडण्याबाबत जाब विचारताच, तिला मारहाण करण्यात आली. यावेळी तिचे पती, सासू-सासरे आणि इतर कुटुंबीय घटनास्थळी पोहोचले.यानंतर त्यांनादेखील काठ्यांनी जबर मारहाण करण्यात आली. या प्रकरणी आरोपी बालकृष्ण शिंदे याच्यासह १६ जणांविरोधात वडवणी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शेतकऱ्यांच्या हक्कावर चाललेली बळजबरी आणि महिलांवरील हिंसाचाराचा हा प्रकार संतापजनक असल्याची प्रतिक्रिया स्थानिक नागरिकांनी दिली आहे. या प्रकरणातील सर्व आरोपी सध्या फरार असून पोलीस आरोपींचा शोध घेत आहेत.

# एनसीपी आमदाराच्या पीएने सरपंचाच्या पतीला घातला गंडा, बीडमध्ये गुन्हा दाखल

बीड, (दिव्य न्युज):- राष्ट्रवादीचे छत्रपती संभाजीनगर शिक्षक मतदारसंघाचे आमदार विक्रम काळे (तळझीरा ज्ञरश्रश) यांचे स्वीय सहाय्यक नयन शेजुळ याच्या विरोधात फसवणुकीचा गुन्हा बीड शहर पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आला आहे. बीड तालुक्यातील सरपंच पती उत्तरेश्वर खताळ यांची तब्बल ६ लाख ७० हजार रुपयांची फसवणूक केल्याचा आरोप शेजुळवर आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, नयन शेजुळ याने आमदार निधीतून किंवा जिल्हा परिषदेमार्फत काम मिळवून देतो, असे सांगून सरपंच पती उत्तरेश्वर खताळ यांच्याकडून ६.७० लाख रुपये घेतले. मात्र, पैसे मिळाल्यानंतरही शेजुळ याने कोणतेही काम न देता सतत टाळाटाळ केली. फसवणुकीदरम्यान शेजुळ याने बनावट ई-





मेल तयार करून त्याद्वारे खताळ यांना विश्वासात घेतले. या ई-मेलमध्ये काम मंजूर झाल्याचे खोटे दाखवून त्यांनी रकमेची मागणी केली होती. विश्वास ठेवून खताळ यांनी पैसे दिले, मात्र प्रत्यक्षात कोणतेही काम मंजूर झाले नव्हते, हे पुढे उघडकीस आले.

फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर उत्तरेश्वर खताळ यांनी बीड शहर पोलीस ठाणे गाठले आणि शेजुळविरोधात फसवणुकीचा गुन्हा नोंदवण्यात आला. पोलिसांनी याप्रकरणी चौकशी सुरू केली असून, अधिक तपास सुरू आहे. या प्रकारामुळे बीड जिल्ह्यातील राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे.

आमदाराच्या स्वीय सहाय्यकावरच फसवणुकीचा आरोप झाल्याने प्रश्नचिन्ह उपस्थित होत असून, आमदार विक्रम काळे यांची या प्रकरणावर भूमिका काय असेल? याकडे सगळ्यांचे लक्ष लागले आहे.दरम्यान, बीडच्या माजलगाव तालुक्यातील किट्टी आडगावच्या सरपंचाला महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत जलसंचन विहिरीच्या प्रस्तावाला मंजुरी देण्यासाठी पैसे घेणे महागात पडलेय. सरपंच रुक्मानंद खेत्रे याने तक्रारदाराच्या आईच्या नावाने मंजूर झालेली विहीर अंतिम यादीत समाविष्ट करण्यासाठी आणि विहिरीच्या प्रस्ताव मंजूर करण्यासाठी वीस हजार रुपयांची लाच मागितली होती. २० हजारांपैकी पहिला हप्ता म्हणून दहा हजार रुपयांची लाच घेताना सरपंच रुख्मानंद खेत्रे याला एसीबीने रंगेहाथ पकडले आहे.



नेकनूर : नेकनुर सर्कल राष्ट्रवादी कांग्रेस पार्टी असंघटीत कामगार विभाग पद नियुक्तिपत्र वाटप व प्रवेश कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी उपस्थित असंगठित कामगार विभागचे जिल्हाध्यक्ष अलिम पटेल, नगर परिषदचे गटनेता फारूक पटेल, राष्ट्रवादी चे नारायण बप्पा शिंदे नेकनूर ग्राम पंचायतचे सरपंच सुंदर लांडगे, ग्राम पंचायत सदस्य शिवाजी शिंदे,सलीम पाशा,खालेद भाई पत्रकार असंगठित कामगार चे उपाध्यक्ष चंद्रकांत काळे,कागजी अबरार सचिव, सोमनाथ पांडरे व इतर पदाधिकारी यांचे हस्ते जफर पाशा जागीरदार यांची नेकनुर सर्कल अध्यक्ष तर उपाध्यक्ष शेख खादिर भाई,कैलास सालुजी शेटे सचीव, शेख उमर शेख खमर श्रवण लहू गालफाडे सहसचिव जमीर हबीब शेख सय्यद इरफान जब्बार संघटक हारून अली सय्यद शेख जफर फतेह मोहम्मद सदस्य शेख आवेश यूनुस शाहेद हबीब सय्यद शेख वाशेद शौकत शेख इसाकोद्दीन खियामोद्दीन सोहिल अनवर शेख शेख मिनहाज मुनीर यांची नियुक्ति करन्य आली.

# सिव्हिलसह लोखंडीचे स्त्री रूग्णालय ठरले सरस

## कार्याकल्पमध्ये नांदुरघाट, धानोरा आणि केज येथील रूग्णालयांना तीन लाख रूपयांचे पारितोषिक

बीड, (दिव्य न्युज):- राज्यस्तरीय 'कायाकल्प' कार्यक्रमांतर्गत नागरी आरोग्य सेवेतील पाच दवाखान्यांनी भरीव आरोग्य सेवेचे काम केल्यामुळे या आरोग्य संस्थांना रोख पुरस्कारांचा मान मिळाला आहे. यात आरोग्य सुविधा, स्वच्छता, व्यवस्थापन आणि रुग्ण सेवा या मापदंडांचे मोजमाप करण्यात आले.

जिल्हा रुग्णालयासह लोखंडी सावरगाव (ता. अंबाजोगाई) येथील स्त्री रुग्णालयासह केजचे उपजिल्हा रुग्णालय व धानोरा (ता. अंबाजोगाई) आणि नांदूरघाट (ता. केज) ग्रामीण रुग्णालयांचा समावेश आहे. 'कायाकल्प' उपक्रमात केवळ रुग्णालयांची स्वच्छता आणि सौंदर्य वाढविणे इतकाच हेतू नसून, रुग्णांना मिळणाऱ्या सेवेचा दर्जा उंचावणे, संसर्ग नियंत्रण, औषधसाठा, कर्मचारी सुरक्षितता, व्यवस्थापन सुधारणा आणि जनसहभाग वाढविणे हेही महत्त्वाचे उद्देश आहेत.राज्यस्तरीय मूल्यांकनात बीडचे जिल्हा रुग्णालय आणि लोखंडीचे स्त्री रुग्णालय प्रत्येकी तीन लाख रुपयांच्या पुरस्कारांचे मानकरी ठरले. तर, केजचे यशासाठी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. संजय राऊत यांच्यासह अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. संतोष शहाणे, निवासी वैद्यकीय अधिकारी १ डॉ. एल. आर. तांदळे यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. सुधीर राऊत, डॉ. हनुमंत पारखे, डॉ. दीपक जरांगे, मेट्रन रमा गिरी, डॉ. जयश्री दराडे, बापू निकाळजे यांच्या टिमने या कामात सहभाग घेतला.

### स्त्री रुग्णालयातही वाढल्या रुग्णसेवा

लोखंडीचे स्त्री रुग्णालय नागरी आरोग्य यंत्रणेत असले तरी याचे ठिकाण गैरसोयीचे मानले जाते. तरीही वैद्यकीय अधीक्षक डॉ. चंद्रकांत चव्हाण यांनी पदभार घेतल्यानंतर या ठिकाणी प्रसुती, सिझेरिअनची संख्या महिन्याला ४० वर पोचली आहे. विशेष म्हणजे बाह्यरुग्णांची संख्या महिन्याला ४० हजार तर आंतररुग्णांची संख्या दररोज ४५ झाली आहे. या ठिकाणी महिन्याकाठी दोन हजारांवर एक्स-रे काढले जातात. आरोग्य केंद्रांतील टिबी निर्मुलन मोहिमेचे एक्स-रे देखील याच ठिकाणी काढले जातात, अशी माहिती येथील वैद्यकीय अधीक्षक डॉ. चंद्रकांत चव्हाण यांनी दिली.



# इराण युद्धात इस्रायलला सर्वात मोठा धक्का

## चीन, रशियाच्या खेळीनं भारताचा मित्र संकटात

दिल्ली, (वृत्तसेवा):- इराणच्या सुरक्षेसाठी रशिया आणि चीननं युनायटेड फ्रंट तयार करण्याची घोषणा केली आहे. याबद्दल अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना अतिशय कठोर संदेश देण्यात आल्याचं वृत्त सीएनएननं दिलं आहे. इस्रायल आणि इराण युद्धात इस्रायलच्या बाजूनं उतरण्याचा अमेरिकेचा प्रयत्न आहे. अमेरिकेनं आपले प्रयत्न कमी करावेत यासाठी आता चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग आणि रशियाचे अध्यक्ष व्लादीमीर पुतीन यांनी ट्रम्प यांना आव्हान केलं आहे.

चीनचे अध्यक्ष जिनपिंग आणि रशियाचे अध्यक्ष पुतीन यांच्यात गुरुवारी फोनवरुन संवाद झाला. इस्रायलनं केलेली कारवाई आंतरराष्ट्रीय कायदे आणि संयुक्त राष्ट्राच्या चार्टरचं उल्लंघन असल्याचं दोन्ही नेत्यांनी म्हटलं. इराणच्या राष्ट्रपतींची हत्या करण्याची जाहीर धमकी ट्रम्प यांनी दिलेली असताना पुतीन आणि जिनपिंग यांच्यात झालेला संवाद महत्त्वाचा आहे. ट्रम्प यांनी दोनच दिवसांपूर्वी इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनेई यांच्या हत्येची धमकी दिलेली आहे.

रशिया आणि चीनच्या अध्यक्षांनी फोनवरुन संवाद साधत इराणवर हल्ला करणाऱ्या इस्रायलचा अतिशय कठोर शब्दांत निषेध केल्याचं वृत्त सीएनएननं दिलेलं आहे. यावेळी जिनपिंग यांची भाषा काही प्रमाणात संयमी होती. त्यांनी इस्रायलचा स्पष्ट शब्दांत निषेध केला नाही. 'युद्धात सहभागी असलेल्या दोन्ही देशांनी, विशेषत: इस्रायलनं युद्ध आणखी पुढे सुरु ठेवू नये. संघर्षाची तीव्रता न वाढण्याची काळजी घ्यावी आणि शस्त्रसंधी करावी,' असं जिनपिंग फोनवर म्हणाले. चीनची अनेक लढाऊ विमानं इराणमध्ये उतरल्याचं वृत्त असताना जिनपिंग आणि पुतीन यांच्यात संवाद झालेला आहे. चीननं इराणला शस्त्र पुरवल्याची शक्यता आहे. पण याला अधिकृत दुजोरा कोणीही दिलेला नाही. मध्य आशियातील अस्थिरतेसाठी चीन अनेक वर्षांपासून अमेरिकेला जबाबदार धरत आलेला आहे. चीनचे अनेक राजकीय तज्ज्ञदेखील सध्याच्या युद्धासाठी अमेरिकेलाच जबाबदार धरत आहेत.


मध्य आशिया सतत धगधगत राहावा ही खुद्द ट्रम्प यांचीच इच्छा असल्याचं ट्रम्प यांना वाटत असल्याचं चीनचे अनेक तज्ज्ञ सांगतात. युक्रेन आणि गाझामध्ये गेल्या अनेक महिन्यांपासून संघर्ष पेटलेला आहे. त्यानंतर आता अमेरिका इस्रायलच्या बाजूनं युद्धात उतरण्याच्या तयारीत आहे. दुसरीकडे इराणमधील खामेनेई शासन कायम राहावं, ही चीनची इच्छा आहे. खामेनेई यांच्या नेतृत्त्वात इराण एक शक्तिशाली देश म्हणून उदयास आल्यानं त्यांची राजवट टिकावी, असा चीनचा प्रयत्न आहे.

चीननं २०२३ मध्ये सौदी अरेबिया आणि इराणशी मैत्री करत अमेरिकेला आश्चर्याचा धक्का दिला होता. संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेत चीननं इराणला अनेकदा पाठिंबा दिलेला आहे. गेल्या काही वर्षांपासून चीन आणि इराणनं संयुक्त नौदल अभ्यास केलेला आहे. दोन्ही देशांचे सामरिक संबंधदेखील उत्तम आहेत. चीननं शांघाय सहाय्य संघटन आणि ब्रिक्समध्ये इराणचं स्वागत केलेलं आहे. यामध्ये चीन आणि रशियादेखील आहेत.

रशियासाठीही इराण महत्त्वाचा आहे. इस्रायल-इराण संघर्ष रोखण्यासाठी रशियानंही मध्यस्थी करण्याची तयारी दर्शवली आहे. चीन आणि रशिया इराणच्या बाजूनं उभे राहिल्यानं अमेरिकेवर दबाव वाढला आहे. अमेरिकेत त्यांच्यावर ज्यू लॉबीनं दबाव वाढवलेला आहे. इस्रायलच्या समर्थनार्थ अमेरिकेनं युद्धात उतरावं, अशी या लॉबीची इच्छा आहे. तर दुसरीकडे आंतरराष्ट्रीय पातळीवर शांततेची गरज आहे. त्यामुळे ट्रम्प यांना संघर्ष थांबवाला लागेल. इस्रायलची भिस्त अमेरिकेवर असल्यानं त्यांचीही कोंडी झालेली आहे.













## अमेरिकेच्या हल्ल्यानंतर पंतप्रधान मोदींना इराणच्या राष्ट्राध्यक्षांचा फोन

अमेरिकेचे इराणच्या अणु प्रकल्पांवरील हल्ले आणि मध्यपूर्वेतील वाढत्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी इराणचे राष्ट्राध्यक्ष मसूद पेझेश्कियान यांच्याशी फोनवरून संवाद साधला. पंतप्रधानांनी त्यांच्या अधिकृत एक्स हँडलवर याबाबत माहिती दिली आहे. पंतप्रधानांनी म्हटले आहे की, इराणच्या राष्ट्राध्यक्षांशी झालेल्या संभाषणादरम्यान त्यांनी सध्याच्या परिस्थितीवर चर्चा केली आणि परिस्थिती बिघडत चालल्याबद्दल चिंता व्यक्त केली.

याबाबत एक्सवरील पोस्टमध्ये माहिती देताना पंतप्रधान मोदी म्हणाले की, यावेळी त्यांनी तणाव कमी करण्याचा, संवाद आणि राजनयिकतेद्वारे समस्या सोडवण्याचा आपला संकल्प पुन्हा एकदा व्यक्त केला. याचबरोबर प्रादेशिक शांतता, सुरक्षा आणि स्थिरता प्रस्थापित करण्यावर भर दिला.

## पुढच्या ५ वर्षांत इराण अणुबॉम्ब बनवेल!

इस्रायल आणि इराणमध्ये युद्ध असतानाच अमेरिकेने त्यात उडी घेतली आहे. अमेरिकेच्या हवाई दलाने इराणमधील फोर्डो, नतान्झ आणि एस्फहान अणुऊर्जा प्रकल्पांवर हल्ला केला आहे. अमेरिकन सैन्याने पूर्ण तयारीने या तळांवर बॉम्ब टाकले, ज्यामध्ये मुख्य लक्ष्य फोर्डो होते. दुसरीकडे इराणनेही या हल्ल्याला प्रत्युत्तर दिलं जाईल असं म्हटलं आहे. अमेरिकेच्या हल्ल्यानंतर जगभरातून प्रतिक्रिया येत आहेत. एमआयएमचे प्रमुख खासदार असदुद्दीन ओवैसी यांनीही या हल्ल्यावर भाष्य केलं. पुढील ५ वर्षात इराण अणुबॉम्ब बनवेल असं असदुद्दीन ओवैसी यांनी म्हटलं.



एआयएमआयएमचे प्रमुख असदुद्दीन ओवैसी यांनी इराणच्या तीन अणुऊर्जा प्रकल्पांवर अमेरिकेने केलेल्या हवाई हल्ल्यांवर प्रतिक्रिया दिली. हे आंतरराष्ट्रीय कायद्याचे आणि संयुक्त राष्ट्रांच्या चार्टरचे उल्लंघन आहे. असे केल्याने, मला खात्री आहे की येत्या पाच वर्षांत इराण अणुशक्ती बनेल. हल्ल्यापूर्वी इराणने आपला साठा हलवला असेल. या हल्ल्यानंतर आता अनेक अरब देशांना वाटेल की त्यांना अणुक्षमतेची आवश्यकता आहे, असं असदुद्दीन ओवैसी म्हणाले.

आपण हे लक्षात ठेवलं पाहिजे की आखाती आणि मध्य पूर्वेत १.६ कोटींहून अधिक भारतीय राहतात. जर त्या प्रदेशात युद्ध झाले तर त्याचा तेथे राहणाऱ्या भारतीयांवर गंभीर परिणाम होईल. भारतीय कंपन्यांनी या सर्व अरब देशांमध्ये किंवा आखाती देशांमध्ये गुंतवणूक केली आहे. परदेशी गुंतवणुकीचा मोठा भाग याच प्रदेशातून येतो. इराणकडे अण्वस्त्रे असल्याची अफवा पसरवली गेली आहे. इराकमध्येही असेच केले गेले. तिथूनही काही बाहेर आले नाही, असेही असदुद्दीन ओवैसींनी म्हटलं.

अमेरिकेने इराणवर केलेल्या हल्ल्यानंतर इस्रायल-इराण युद्ध भडकण्याची शक्यता वाढली आहे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटलं होतं की ते इराणविरुद्धच्या युद्धात इस्रायलला पाठिंबा देण्याचा निर्णय दोन आठवड्यात घेतील. मात्र त्यांनी हा निर्णय अवघ्या दोन दिवसांत घेतला आणि रविवारी पहाटे, अमेरिका युद्धात सामील झाली आणि त्यांनी इराणच्या अणुऊर्जा प्रकल्पांवर हल्ला केला.





पान ४ वरून

## जिल्ह्यातून उभा राहिलेला आष्टीच्या तहसीलदार

उपलब्ध नाही, तिथे तात्काळ बांधकाम सुरू करावे, आणि जी ठिकाणे निकामी स्थितीत आहेत, ती सुसज्ज करून कार्यान्वित करावीत. इतकेच नव्हे तर, संबंधित यंत्रणांनी या कामाचा अहवाल जिल्हाधिकारी कार्यालयात सादर करण्याचे आदेशही दिले आहेत.

महिलांचा प्रश्न - सालेहा जिलानी शेख यांच संघर्षशील नेतृत्व !

या निर्णयामुळे बीड जिल्ह्यातील महिलांच्या आरोग्य, सन्मान आणि सार्वजनिक सहभागासाठी एक नवा मार्ग खुला झाला आहे. सालेहा जिलानी शेख यांच्या संघर्षशील नेतृत्वामुळे महिलांच्या हक्काला ठोस प्रशासनिक पाठबळ मिळाले आहे.

या निर्णयामुळे बीड जिल्ह्यातील महिलांसाठी केवळ स्वच्छता नव्हे, तर सन्मान, सुरक्षितता आणि सार्वजनिक सहभागाचा नवा मार्ग खुले झाला आहे. अनेक वर्षे दुर्लक्षित असलेला प्रश्न सालेहा जिलानी शेख यांच्या संघर्षशील नेतृत्वामुळे आज प्रशासनाच्या अजेंड्यावर आला आहे.

सदरील रिक्त जागेंवर संगणकीय बदलीच्या माध्यमातून येणारे प्राथमिक पदवीधर शिक्षक हे एकेवेळी ६०-७० विद्यार्थिनींना इंग्रजीतुन उत्कृष्ट अध्यापन देण्याचा अनुभव असणारे, शिष्यवृत्ती, छचचड परीक्षेसाठी जादाचे तास घेऊन गुणवत्ता जपणारे तसेच विषयातील सखोल विषयज्ञान असणारे असावेत, प्रशालेत इंटर एकटिव्ह पॅनल, डिजिटल बोर्ड, ओव्हर हेड प्रोजेक्टर आदी उपरकने अध्यापनासाठी असून त्याद्वारे अध्यापन करता येणारे शिक्षक तंत्रस्नेही व अनुभवी असावेत अशी मागणी सर्व पालक व शाळा व्यवस्थापन समितीची असून वरील अपेक्षा पूर्ण करणाऱ्या शिक्षकांनीच संगणकीय बदलीच्या माध्यमातून जि.प.कन्या प्रशालेसाठी आपला पसंती क्रमांक द्यावा असे ठरावात नमूद केले आहे. याचबरोबर अकार्यक्षम, विषयज्ञानाचा अभाव, इंग्रजी, गणित व विज्ञान हे विषय इंग्रजी माध्यमातून अध्यापन करू न शकणाऱ्या आणि जास्तीच्या पटसंख्येत अध्यापन न करता येणाऱ्या, इ.१ ते ४ वर्गांना सेमी इंग्रजी माध्यमातून अध्यापन न करता येणाऱ्या शिक्षकांनी संगणकीय प्रक्रियेतुन बदली करून कन्या प्रशालेत येऊ नये, जर असे अकार्यक्षम शिक्षक बदली करून प्रशालेत आले आणि त्यांच्या अध्यापनाबाबत काही तक्रारी आल्या तर त्यांच्या तक्रारीचा गांभीर्याने विचार करून शालेय व्यवस्थापन समिती वरिष्ठांकडे ठराव देईल असा इशारा ही ठरावात देण्यात आला आहे. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक श्री. खताळ सर, प्रभा वायकर, समरीन काझी, जयश्री धोंडे, अश्विनी घालमे, विद्या डोंगरदिवे, अनिता लांबडे, पंखांबाई रेडेकर, डॉ नदीम शेख, रुख्मिनी करपे आदी मान्यवर उपस्थित होते.

## कोरेगाव भीमा जयस्तंभ

आहे. जिंतूर तालुक्यातील वीस गावांतील बुध्द विहारांना मोफत बुद्ध मूर्ती भेट देण्यात आल्या. पिडीत घटकांवर अन्याय अत्याचार विरोधात शेकडो आंदोलने मोर्चे काढून सामाजिक न्याय देण्याचा प्रयत्न केला. सर्व सामाजिक व धार्मिक कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून वैचारिक प्रबोधनाचे काम करीत आहेत. जिंतूर तालुक्यातील दुर्गम भागात पक्का रस्ता मिळावा यासाठी त्यांनी उलगुलान आंदोलन करून यश मिळविले आहे. बहुजन महापुरुषांच्या विचारधारा समाजाच्या प्रत्येक घटकांपर्यंत पोहचविण्यासाठी ते सामाजिक प्रबोधनाचे कार्यक्रम आयोजित करतात तसेच ते विविध सोशल मीडियाच्या चॅनेलवरून जनतेचे प्रश्न शासकीय स्तरावर मांडून ते सोडविण्याचे काम करतात. भीमा कोरेगाव विजयस्तंभ अतिक्रमण न्यायालयीन लढ्यात ते मागील काही वर्षापासून सक्रिय सहभागी आहेत. या ऐतिहासिक न्यायालय लढ्यात रत्नदीप शेजावळे जनजागृतीचे काम तन, मन आणि आपले सर्वस्व लावून करतील या अपेक्षेने जयस्तंभ बचाव समितीचे प्रमुख दादाभाऊ अभंग यांनी मुंबई येथून त्यांच्या निवडीची घोषणा केली आहे. शेजावळे यांच्या निवडीचे आंबेडकरी समाजातून स्वागत होत असून त्यांच्या पुढील कार्यास हार्दिक शुभेच्छा दिल्या आहेत.



पान १ वरून

## शिक्षकांच्या पगाराचा

लक्षात येताच या प्रकरणात नागपूर सायबर पोलिसांनी एसआयटीची स्थापना केली. सध्या एसआयटीद्वारे या प्रकरणाचा तपास सुरू आहे.

पोलिसांनी उल्हास नरड यांना अटक केल्यानंतर एकामागून एक लिंक समोर येत गेल्या. त्यानंतर शिक्षण उपसंचालक कार्यालयातील कनिष्ठ लिपिक लक्ष्मण मंघाम यांना अटक करण्यात आली होती. त्यांच्या चौकशीतून नागपूर विभागीय मंडळाचे अध्यक्ष चिंतामण वंजारी यांना अटक करण्यात आली. विशेष म्हणजे चिंतामण वंजारी यांच्या अध्यक्षतेखालीच सुरुवातीला शिक्षण विभागानं चौकशी समिती स्थापन केली होती. त्यानंतर निवृत्त शिक्षण उपसंचालक अनिल पारधी, माजी विभागीय उपसंचालक वैशाली जामदार या बड्या अधिकाऱ्यांना अटक करण्यात आली. तसेच शिक्षण विभागातील काही लिपिकांनाही अटक करण्यात आली आहे.

एसआयटीनं तपास हाती घेतल्यानंतर ९ आरोपींना अटक करण्यात आली होती. त्यापैकी उल्हास नरड, अनिल पारधी या बड्या अधिकाऱ्यांसह सुरज नाईक, सागर भगोले, भारत ढवळे या लिपिकांना जामीन मंजूर झाला आहे. वैशाली जामदार यांच्यासह चिंतामण वंजारी आणि मंघाम यांचा जामीन कोर्टानं फेटाळून लावला आहे. सध्या ते न्यायालयीन कोठडीत आहेत, अशी माहिती सुनिता मेश्राम यांनी दिली. जशा लिंक समोर येत आहेत त्यानुसार काही संस्थाचालकही रडारवर आहेत. धापेवाडा इथल्या श्री विठ्ठल रुक्मिणी बहुद्देशीय शिक्षण संस्थेच्या सचिव दिलीप धोटे यांना अटक करण्यात आली आहे. त्यांच्या संस्थेच्या दोन शाळा असून त्यांनी शिक्षकांची बोगस नियुक्ती केल्याचा आरोप त्यांच्यावर आहे. सध्या ते पोलीस कोठडीत असून त्यांची चौकशी सुरू आहे. शासनानं सुरुवातीलाच निलंबनाची कारवाई केलेले वेतन अधीक्षक नीलेश वाघमारे फरार असून त्यांचा शोध सुरू आहे, असं पोलिसांनी सांगितलं.एसआयटी चौकशीतून आतापर्यंत काय काय समोर आलं?

एसआयटीच्या प्रमुख सुनिता मेश्राम यांनी दिलेल्या माहितीनुसार, सायबर पोलीस ठाण्यात सुरुवातीला शालार्थ आयडी हॅक किंवा त्याचा गैरवापर झाल्याची तक्रार आली होती. पण, एसआयटीनं तपास केला असता शालार्थ आयडी हॅक झाला नसल्याचं समोर आलं आहे. कारण, बनावट आयडी तयार करण्याच्या प्रस्तावावर या बड्या अधिकाऱ्यांच्या सह्या आहेत. विभागीय मंडळाचे अध्यक्ष चिंतामण वंजारी यांनीच अप्रूव्हल दिलं आहे. कागदपत्रांवर त्यांच्या सह्या असल्याचंही समोर आलं आहे. तसेच सगळ्यात जास्त बनावट शालार्थ आयडी निलंबित शिक्षण उपसंचालक उल्हास नरड यांच्या कार्याकाळात तयार झाले आहेत. शिक्षण उपसंचालकांच्या आदेशावरूनच लिपिक शालार्थ आयडी तयार करतात. हे आयडी फक्त कार्यालयातून नाही, तर घरातूनही सुद्धा तयार करण्यात आले आहेत.

यामध्ये कोणीही एक मुख्य आरोपी नसून अधिकारी, लिपिकांसह शाळेचे संस्थाचालक अशा सगळ्यांनी संगनमतानं केलेला हा घोटाळा आहे. यामध्ये ६०० च्या वर शिक्षक, ५०-६० संस्थाचालकांचा समावेश असून सध्या ४० शाळांची तपासणी सुरू आहे. यादीमध्ये नाव असलेल्या शिक्षकांनाही देखील चौकशीसाठी बोलावण्यात आलं आहे. पण, भीतीपोटी शिक्षक चौकशीला सहकार्य करत नाहीत. सध्यातरी हा घोटाळा जवळपास २०० कोटी रुपयांचा असल्याचा अंदाज आहे. मात्र त्याचा नेमका आकडा हा एसआयटीची चौकशी पूर्ण झाल्यावरच समोर येईल. कारण, अजून अनेक शाळांचा चौकशी सुरू आहे. बनावट शालार्थ आयडी तयार केलेल्या शिक्षकांचे पगार सध्या शासनानं थांबवले आहेत. तसेच ज्या अधिकाऱ्यांना अटक करण्यात आली आहे त्यांनी या घोटाळ्यात किती पैसा लाटला त्यासाठी बँकेला पत्र पाठवण्यात आलं आहे. या अधिकाऱ्यांची बँक खाती गोठवण्याचं काम सुरू आहे. ते म्हणाले की, संबंधित आयडींवरील पगार बंद केले आहेत. सायबर पोलिसांच्या चौकशीत दोषी आढळणाऱ्यांवर फौजदारी कारवाई होईल. शिवाय त्या शिक्षकांना नोकरीवरून काढले जाईल.

